# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
# जिल्हा - ठाणे.

प्रसिध्दीसाठी
दिनांक:- १५/०१/२०२५.

**<u>ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून भिवंडी महानगरपालिकेच्या वतीने साजरा करण्यात आला.</u>**

महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून १५ जानेवारी "राज्य क्रीडा दिना" निमित्त भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १४ व १७ वर्ष मुले वयोगटातील जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन स्व. राजय्या गाजेंगी हॉल, कोंबडपाडा, भिवंडी येथे सकाळी ११:०० वाजता मा. प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांचेबद्दल नमूद केले की खाशाबा जाधव यांचा जन्म दिनांक १५ जानेवारी १९२६ मध्ये गोळेश्वर सातारा येथे झाला. खाशाबा हे ख्यातनाम पैलवान दादासाहेब जाधव यांचे सर्वात लहान चिरंजीव असून त्यांनी आठ वर्षाचे असतानाच त्यांचे भागातील प्रसिद्ध चॅम्पियनला दोन मिनिटात लोळवण्याचा पराक्रम केला होता. सन १९५२ मध्ये हेलसिंकी ऑलम्पिक स्पर्धा मध्ये ५२ किलोग्रॅम वजन गटात फ्रीस्टाइल प्रकारांतर्गत कांस्य पदक जिंकले. हे पदक स्वतंत्र भारतातील पहिले वैयक्तिक पदक होते. सन १९५५ मध्ये खाशाबा जाधव हे महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उप निरीक्षक म्हणून रुजू झाले. त्यांना सन १९९२-९३ मध्ये महाराष्ट्र सरकारने खाशाबा जाधव यांना मरणोत्तर छत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित केले. तर सन २००० मध्ये भारत सरकारकडून त्यांना मरणोत्तर अर्जुन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात अशी माहिती सदर प्रसंगी माननीय आयुक्त यांनी उपस्थितांना दिली. त्याचबरोबर खेळाचे महत्व पटवून देत असताना त्यांनी हे देखील नमूद केले की विविध खेळाला पोषक असं वातावरण तयार व्हावे. त्यातून चांगले खेळाडू तयार होतील. कोणताही क्रीडा प्रकार खेळताना आपल्या शारीरीक व मनाचा व्यायाम हा होत असतो. महानगरपालिकेच्या वतीने अशा विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असले बाबत त्यांनी नमूद केले. राज्य क्रीडा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धेत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १२५ हून अधिक खेळाडूंनी सदर स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला आहे. विजयी खेळाडुंना प्रमाणपत्र, मेडल स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात आले. भिवंडी शहर प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून क्रीडा क्षेत्रातही अनेक गुणवंत क्रीडा खेळाडू नावारुपाला येतील अशी आशा महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांनी व्यक्त केली. यावेळी महानगरपालिकेचे मा. अतिरीक्त आयुक्त श्री. देविदास पवार, श्री. विठ्ठल डाके, मा.उप आयुक्त (मुख्यालय) श्री. शैलेश दोंदे, उपायुक्त (क्रीडा विभाग) डॉ. अनुराधा बाबर, उपायुक्त (समाज कल्याण) श्रीमती प्रणाली घोंगे, शहर अभियंता श्री. जमिल पटेल, अग्निशामक विभाग प्रमुख राजेश पवार, क्रीडा विभाग प्रमुख मिलिंद पळसुले, क्रीडा अधिकारी शरद कलावंत, मुख्य उद्यान अधिक्षक श्री. निलेश संख्ये, वाहन विभाग प्रमुख श्री. प्रशांत संख्ये,महानगरपालिकेचे अन्य अधिकारी, जिल्हा कुस्ती तालिम संघाचे उपाध्यक्ष श्रीराम पाटील व अन्य क्रीडा समिती सदस्य व शिक्षक उपस्थित होते.

(श्रीकांत परदेशी)
माहिती व जनसंपर्क अधिकारी
भिवंडी नि. शहर महानगरपालिका